जा.क्र. स्था.गु.शा/प्रेस नोट/ ३११२ /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग,
फॅक्स नं. 02362-228205,
दिनांक - २८/10/2020.

प्रेस नोट

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदूर्ग कडून गोवा बनावटीची वाहतुक करणाऱ्या कंटेनर मधुन 60 लाखाची दारु जप्त.

---

मा. श्री. राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक, मा. श्री. तुषार पाटील अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सिंधुदूर्ग जिल्ह्यात अवैद्य गोवा बनावटीची दारु वाहतुकी विरोधात कारवाईसाठी मोहीम आखण्यात आली होती.

दि.27/10/2020 रोजी पहाटे मुंबई गोवा महामार्गावर स्थानिक गुन्हे शाखा, सिंधुदुर्ग पथकाने मिळालेल्या खात्रीशीर बातमी वरुन सापळा लावला होता. पहाटेच्या सुमारास गोव्यातुन मुंबई दिशेने जाणारा संशईत कंटेनर आला असता तो चेक केला. कंटेनर मध्ये वेगवेगळया प्रकारचे विदेशी मद्य व बिअर असे एकुण 1052 बॉक्स मिळून आले. सदर कंटेनरला ओरोस राजधानी हॉटेल समोरील रोडवर सापळा रचून गोवा बनावटीची 60,13,200/- ( साठ लाख तेरा हजार दोनशे रुपये ) किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर कारवाई श्री.सुनिल धनावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदरबाबत सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे रितसर गुन्हा दाखल करुन कंटेनरचा चालक व क्लीनर यास अटक करण्यात आलेली आहे.

सदर कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक- श्री.सचिन शेळके व पोलीस अंमलदार-श्री. रामचंद्र शेळके, सुधीर सावंत ,प्रकाश कदम,एस.एस. खाडये,सत्यजित पाटील, ज्ञानेश्वर कांदळगांवकर, कृष्णा केसरकर, अनुप खंडये, अमित तेली, रवि इंगळे ,पी. पी. वालावलकर, फकीर काळसेकर, चंद्रकांत पालकर, पी. पी. गावडे , चंद्रहास नार्वेकर यांनी सहभाग घेतला.

0

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक, स्थागुशा सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग